अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १४ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २८५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## मध्यरात्री टेलीफोनच्या खांबाला गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**सोलापूर** : तेलंगणा येथून सोलापुरात भावाकडे राहण्यात आलेल्या एका ५२ वर्षीय इसमाने टेलिफोनच्या खांबाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना एमआयडीसी परिसरातील विनायक नगरात गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास उघडकीस आली. बाबू बुढप्पा अच्चुगटला (वय५२ मूळ रा. तांडूर,तेलंगणा सध्या रा.शिवगंगा चौक एमआयडीसी) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह शिवगंगा चौक येथील रस्त्याच्या कडेला असलेल्या टेलिफोनच्या लोखंडी खांबाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो मयत झाल्याचे सांगण्यात आले.


Supreme
People who know plastics best
'सुप्रीम'
ansons anco
कॉमेट
Authorised Dealer
Rivulis Irrigation
रिवुलीस ठिबक सिंचन
मल्लिकार्जुन हुळ्ळे मोबा.9423590463
शाम जाधव मोबा.9423588463
गुरुगणेश एन्टरप्राईजेस
'सुप्रीम'
Lubi PUMPS-MOTORS
वैष्णवी कॉर्नर, गोल्डफिंच पेठ, युको बँक शेजारी,
भागवत टॉकिज समोर, सोलापूर.दु.नं.(0217)2725363
Email:guruganeshenterprises123@rediffmail.com

# दोघात तिसरा... मंत्रीपद विसरा..!

## 'अर्थ' वरुन 'अनर्थ' आता विस्तार अधिवेशनानंतरच

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**शिंदे-फडणवीस सरकारचा बहुचर्चित आणि शेवटच्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्तार लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार, असे सांगितले जात होते. मात्र, गेल्या काही दिवसांमधील घडामोडी पाहता मंत्रिमंडळाचा विस्तार हा पावसाळी अधिवेशनानंतरच होऊ शकतो, अशी माहिती अजित पवार यांच्या गटातील वरिष्ठ नेत्याने दिली. सूत्रांच्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासमवेत अजित पवार व खा. प्रफुल्ल पटेल यांच्यात नवी दिल्ली येथे याबाबत चर्चा झाली. त्यानंतर अमित शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरध्वनीद्वारे चर्चा करुन अर्थ खाते सोडून इतर खात्यावर मार्ग काढल्याचे समजले. हे खातेवाटप शुक्रवारी होईल, असे संकेत मिळाले आहेत.**




### 'अर्थ' देण्यास अनेक आमदारांचा विरोध : फडणवीस

एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस हे अजित पवार यांना कोणत्याही परिस्थितीत अर्थ खाते देण्यास तयार नाहीत. फडणवीसांनी ठाम भूमिका घेतली आहे की, भाजपला अजित पवारांचा पुरेपूर आदर आहे. मात्र, त्यांचा दृष्टीकोन वास्तवतवादी आणि व्यवहारी असला पाहिजे. सध्याच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्र्यांनी अजित पवार यांना अर्थ खाते देण्यास विरोध केला आहे. शिंदे गटाने ठाकरेंची साथ सोडताना आमदारांनी तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार निधीवाटपात कोंडी करत असल्याचा आरोप केला होता. तरीही आम्ही अजित पवारांना अर्थखाते देण्याविषयी विचार करु. मात्र, त्यांनी मागणी केलेली सर्व खाती राष्ट्रवादी काँग्रेसला देता येणार नाहीत, असे फडणवीस म्हणाले.

### अजित पवारांचे दबावतंत्र...

राष्ट्रवादीकडून अर्थ खात्यासह ऊर्जा, जलसंपदा, सहकार, सार्वजनिक बांधकाम आणि गृहनिर्माण या खात्यांची मागणी होत असल्याचं म्हटलं जात आहे. तर राष्ट्रवादीकडून सातारा, सांगली आणि पुणे या जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रह होत असून यासाठी अजित पवारा दबावतंत्राचा वापर करीत असल्याने बोलले जात आहे.

### राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करा : नाना पटोले

राज्यातील राजकीय वातावरण गढूळ झाले असून भाजपाच्या सत्तापिपासू वृत्तीने राज्यात शासन व प्रशासनही ठप्प आहे. जनतेला वाऱ्यावर सोडून देऊन मलाईदार खात्यासाठी साठमारी सुरू आहे. राज्यात अलिबाबा ४० चोरांसारखी परिस्थिती असून जनतेची तिजोरी लुटली जात आहे. राज्यपाल व महामहिम राष्ट्रपती यांनी यात हस्तक्षेप करुन राज्यात तातडीने राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्याकडून करण्यात आली आहे.

### अर्थखाते अजित पवारांनाच मिळणार : वडेट्टीवार

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या खातेवाटप आणि मंत्रीमंडळावर बोलताना जोरदार शाब्दिक हल्ला केला. तसेच शिंद गटाने कितीही विरोध केला, तरी अर्थमंत्रीपद अजित पवारांनाच मिळेल, असा मोठा दावा केला. ते म्हणाले, शिंदे गटाकडून अजित पवारांना अर्थखातं देण्याला विरोध होत आहे. आता अजित पवारांना जाहिरपणे सांगा की, आम्ही राहू शकत नाही. शिंदे गटात थोडासा जरी स्वाभिमान असेल, तर त्यांनी सरकारमधून बाहेर पडलं पाहिजे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तातडीने मंत्रिमंडळ विस्तार व्हावा, यासाठी आग्रही होते. मंत्रिमंडळ विस्तारात शिंदे गटाच्या चार ते पाच आमदारांनाच संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर शिंदे गटातील उर्वरित आमदारांमध्ये असंतोष उफाळून येण्याची शक्यता आहे. अधिवेशनकाळात यामुळे बाका प्रसंग उद्भवू शकतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी मंत्रिमंडळाचा विस्तार हा लांबणीवर पडण्याची दाट शक्यता आहे.

अजित पवार यांनी २ जुलै रोजी राजभवनात उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यावेळी मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला होता. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र, त्यावेळी शिंदे गटाचे आमदार वंचित राहिले होते. त्यामुळे आगामी मंत्रिमंडळ विस्तार तातडीने करून आपल्या गटाच्या आमदारांना मंत्रिमंडळात स्थान देण्यासाठी एकनाथ शिंदे प्रयत्नशील होते. गेल्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना कोणतेही खाते देण्यात आले नव्हते. खातेवाटपाविषयी गेल्या तीन-चार दिवसांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा सुरू आहे. मात्र, वर्षा बंगल्यावरील दोन मॅरेथॉन बैठकांनंतरही खातेवाटपाचा तिढा सुटला नव्हता. त्यामुळे अजित पवार हे बुधवारी संध्याकाळी दिल्लीत अमित शाह यांच्या भेटीला गेले होते. या भेटीत खातेवाटपावर तोडगा निघाल्याची माहिती आहे. अजित पवार यांचा गट अर्थ, महसूल आणि जलसंपदा या तीन खात्यांसाठी आग्रही आहे. नंतर पवार यांनी उत्पादन शुल्क खात्याची मागणी केल्याची माहिती आहे.

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानात सोलापूर राज्यात अव्वल




- ६१ कामांमधून ११.५० लाख घन मीटर गाळ काढला
- ११५ कोटी लीटर अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध

सुराज्य/सोलापूर

> काढण्यात आलेला ११.५० लाख घनमीटर इतका गाळ क. सुमारे पंधराशे एकर क्षेत्रामध्ये हा गाळ पसरविण्यात आलेला आहे. यामुळे ११५ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झालेला आहे. योजनेमध्ये २५ अशासकीय संस्था सहभागी झाल्या आहेत. अंदाजे १५०० शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेत आपली जमीन सुपिक केल्या आहेत.
>
> **- दयासागर क्षमा (जिल्हा जलसंधारण अधिकारी)**

> जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत प्राथमिक आराखड्यानुसार ९३ कोटी ९२ लाखाची २ हजार ८९६ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यातील १ हजार ९४० कामांना मंजुरी देऊन त्यातून ८६५ कामे सुरू झाली. सुरू झालेल्या कामातून ५७७ कामे पूर्ण झाली आहेत. कामांची ही गती खूपच कमी असल्याने संबंधित सर्व शासकीय यंत्रणांनी जलयुक्तच्या कामांची गती वाढवावी
>
> **- मिलिंद शंभरकर (जिल्हाधिकारी)**

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची सोलापुरात जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी झाली. ११ तालुक्यात १०९ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली होती. त्यातील ६१ कामे पूर्ण झाली आहेत. ६१ कामामधून ११.५० लाख घन मीटर गाळ काढला गेला आहे. या कामांमुळे ११५ कोटी लीटर अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. गाळा काढण्यात सोलापूर जिल्हा राज्यात अव्वल आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलयुक्त शिवार अभियान २.० आढावा बैठक जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी घेतली. या बैठकीस जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर क्षमा, उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी डी.एस. कदम, आर.डी. क्षीरसागर, जे.के.बंकापुरे, एच. सी. समताळे उपस्थित होते.जलयुक्त शिवार अभियान २.० हे राज्य शासनाचा प्राधान्यशील उपक्रम आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी जलयुक्त मध्ये मंजूर करण्यात आलेली सर्व कामे सुरू करावी. कृषी, भूजल, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा या विभागांनी जलयुक्त अंतर्गत मंजूर असलेली कामे सुरू केलेली दिसून येत नाहीत, तरी या विभागप्रमुखांनी पुढील १५ दिवसात ही कामे सुरू करून विहित वेळेत पूर्ण करून घ्यावीत अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

## किराणा दुकान फोडून पावणेदोन लाख लंपास

**बार्शी** : किराणा दुकानाच्या दरवाजाचा कोयंडा कुलुपासह कापून दुकानातील पावणेदोन लाख रूपये रोकड चोरून नेल्याची घटना बार्शी शहरातील जावळे प्लॉट भागात घडली. दि. १३ रोजी सकाळी ही चोरीची घटना उघडकीस आली. याबाबत आशिष रामलाल मालू वय ४७ यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यावरून अज्ञात चोरट्याविरोधात बार्शी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

आशिष हे दि. १२ रोजी रात्री ९.१५ वा दुकान बंद करून कुलूप लावून दुकानाच्या पाठीमागे असलेल्या घरी गेले. दि. १३ रोजी सकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास ते दुकान उघडण्यासाठी गेले असता दुकानाचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी तेथे जाऊन पाहिले असता कुलुपासह कोयंडा कापलेला दिसला. आत जाऊन पाहिले असता ड्रॉव्हर उघडा दिसला. दुकानातील कपाटावर ठेवलेली चावी घेऊन कपाट उघडून त्यातील ठेवलेली रक्कम १ लाख ७५ हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे दिसून आले.

विनम्र अभिवादन



स्व.राजेश (अण्णा) विष्णुपंत कोठे

सहवसा जरी सुटला स्मृती सुंगध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील.
आपल्या स्मृतीस जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली!

सुराज्य सोलापूर
परिवार, सोलापूर

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



टमाट्याची तरी राखण कर, का तेही आमीच बघायचं!

कल्याण
568-94-167

मुंबई
238-31-588

## काँग्रेस कदापि फुटणार नाही


### पण जनता फुटिरांची पळताभुई थोडी करेल

**काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांचा दावा**

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अशी परिस्थिती आली आहे की दोन प्रमुख पक्ष फुटले आहेत. शिवसेना मागच्या वर्षी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यावर्षी. त्यानंतर आता काँग्रेस पक्षही फुटणार याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेस फुटीच्या मार्गावर असल्याचे गौप्यस्फोट केला तर सेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनीही काँग्रेसमधले लोकही यायला इच्छुक आहेत असं म्हटलंय. तसंच आमदार बच्चू कडू यांनीही हेच वक्तव्य केलं. या सगळ्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरू असताना माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांना बुधवारी सोलापुरात जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, असं मुळीच वाटत नाही की काँग्रेस पक्ष फुटेल. एकदा काँग्रेस पक्ष फुटला ही वस्तुस्थिती आहे. पण यापुढे काँग्रेसला फुटीरतेचा डाग लागेल असं वाटत नाही. जे काही घडलं आहे त्यावर आता काय बोलणार? पुढे काय काय घडतंय बघावं लागेल. कशा तऱ्हेने सरकार चालवलं जातं ते बघू.



टिळक स्मारकाच्या पुरस्कारावर मात्र त्यांनी नो कॉमेंट इतकंच उत्तर दिलं आहे. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जे बंड झालं त्यानंतर मी शरद पवारांना भेटलो नाही असंही शिंदे यांनी सांगितलं आहे.

जे काही घडलं आहे त्यावर आता काय बोलणार? पुढे काय काय घडतंय बघावं लागेल. कशा तऱ्हेने सरकार चालवलं जातं ते बघू. टिळक स्मारकाच्या पुरस्कारावर मात्र त्यांनी नो कॉमेंट इतकंच उत्तर दिलं आहे. तसंच राष्ट्रवादीमध्ये जे बंड झालं त्यानंतर मी शरद पवारांना भेटलो नाही असंही शिंदे यांनी सांगितलं आहे.